महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
**पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर**
जि. लातूर-४१३५१७ (महाराष्ट्र)
(Email: adcovasudg@mafsu.ac.in)

जा. क्र. व्हीसीयु/ 1059 /२०२५ दिनांक: १९/०८/२०२५

## जाहीर प्रगटन

पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर येथील अ इमारत, ब इमारत व टिव्हीसीसी येथे अनलिमिटेड (अमर्यादित) इंटरनेट सुविधा पुरविण्यासाठी पुरवठादारांकडून सीलबंद लीफाफ्यामध्ये निविदा/दरपत्रके मागवण्यात येत आहेत.

इच्छुक पुरवठादारांनी खाली दिलेल्या नमुन्यामध्ये अनलिमिटेड (अमर्यादित) इंटरनेट सुविधा पुरविण्यासाठी सीलबंद लीफाफ्यामध्ये निविदा/दरपत्रके सादर करावीत.

| अ. क्र | विवरण | वार्षिक दर (रू) (जिएसटी अंतर्भूत करून) (Incl. GST) |
|---|---|---|
| | **Unlimited Internet Service with Static IP Address:** | |
| 1. | Speed: 100 Mbps | ------------------------------------------ |
| 2. | Speed: 200 Mbps | ------------------------------------------ |
| 3. | Speed: 300 Mbps | ------------------------------------------ |

- इच्छुक पुरवठादारांनी वर नमूद नमुन्यामध्ये अनलिमिटेड (अमर्यादित) इंटरनेट सुविधा पुरविण्यासाठी **सीलबंद लीफाफ्यामध्ये निविदा/दरपत्रके दिनांक १९/०८/२०२५ रोजी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत "मा. सहयोगी अधिष्ठाता, पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर"** यांच्या नावे **कार्यलयीन वेळेत सादर करावीत**.
- पुरवठादाराकडून सादर दरपत्रकामधील दर अवाजवी असल्याचे आढळून आल्यास कोणतेही कारण न देता सदर दरपत्रक किंवा पुरवठादाराचा निविदा प्रक्रियेमधील सहभाग रद्द करण्याचे सर्व अधिकार या कार्यालयास असतील.
- इतर अटी व शर्ती सोबत पुढील पानावर जोडल्या आहेत. सर्व अटी व शर्ती इच्छुक पुरवठादारांनी दरपत्रके सादर करण्यापूर्वी काळजीपूर्वक वाचाव्यात व त्या मान्य असल्याचे पत्र व इतर आवश्यक कागदपत्रे निविदेसोबत जोडावीत.

**सहयोगी अधिष्ठाता**
**पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर**

सहयोगी अधिष्ठाता
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय
उदगीर जि.लातूर

प्रत: १. सूचना फलक: कार्यालय, पशुपैदास क्षेत्र, मपमविवि उपकेंद्र, उदगीर.
२. नोडल ऑफिसर, महाविद्यालय संकेतस्थळ (**https://covasudgmafsu.ac.in/**) येथे प्रदर्शित करण्यासाठी.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
**पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर**
जि. लातूर-४१३५१७ (महाराष्ट्र)
(Email: adcovasudg@mafsu.ac.in)

## अटी व शर्ती

पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर येथील अ इमारत, ब इमारत व टिव्हीसीसी येथे अनलिमिटेड (अमर्यादित) इंटरनेट सुविधा पुरविण्यासाठी (एक वर्षाकरिता) अटी व शर्ती खालीलप्रमाणे.

१. पुरवठादारास तीन स्वतंत्र **Static IP Address** (अ इमारत, ब इमारत व टिव्हीसीसी प्रत्येक कनेक्शन साठी स्वतंत्र **Static IP Address**) देणे अत्यावश्यक व बंधनकारक आहे.

2. एकदा सादर (**allot**) केलेले **Static IP Address** कोणत्याही परिस्थितीमध्ये पुरवठादारास करार कालावधी संपेपर्यंत बदलता येणार नाही व बदलल्याचे किंवा तो इतर व्यक्ती किंवा संस्था यांना वितरीत केल्याचे आढळून आल्यास सदर पुरवठादाराची सेवा तात्काळ रद्द करण्याचे अधिकार या कार्यालयास असतील.

३. अनलिमिटेड (अमर्यादित) इंटरनेट सुविधा पुरविण्यासाठी/रिचार्जसाठी लागणारा खर्च (बिल) पुरवठादाराने दरपत्रकामध्ये/निविदेमध्ये नमूद केल्याल्या दराप्रमाणे पुरवठादारास सहा महिन्यांच्या दोन टप्प्यांमध्ये ॲडव्हान्स म्हणून अदा करण्यात येईल.

४. अनलिमिटेड (अमर्यादित) इंटरनेट सुविधा पुरविण्यासाठी महाविद्यालयातील विविध विभागांसाठी लागणारे केबल, कनेक्टर व इतर साहित्य सदर पुरवठादारास स्वखर्चाने पुरवावे लागेल.

५. अनलिमिटेड (अमर्यादित) इंटरनेट स्पीड/सुविधा किंवा केबल कनेक्शन यांमध्ये कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण किंवा खंड पडल्यास तो तात्काळ दुरुस्त करण्याची जबाबदारी पुरवठादारची राहील. तसेच सदरील कामात कोणतीही हयगय आढळून आल्यास सदर करार एकतर्फी रद्द करण्याचे सर्व अधिकार मा. सहयोगी अधिष्ठाता यांना असतील.

६. पुरवठा आदेश निर्गमित केल्यानंतर कुठल्याही नवीन अटी व शर्ती किंवा निविदेत सादर केलेल्या दरांमध्ये बदल पुरवठादाराकडून या कार्यालयास लागू करता येणार नाहीत.

७. अनलिमिटेड (अमर्यादित) इंटरनेट सुविधा पुरविण्यासाठीचा करार हा कार्यालयाकडून पुरवठा आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून एक वर्षासाठी वैध असेल.

८. पुरवठादाराने सादर केलेल्या दरपत्रकामध्ये नमूद केलेल्या फर्म च्या नावानेच **GST Number, PAN Number** व **Bank Account Number** इत्यादीची नोंदणी असणे बंधनकारक असेल व नमूद फर्म च्या नावानेच देयक अदा केले जाईल (या सर्व बाबींचे आवश्यक पुरावे/कागदपत्रे निविदेसोबत सादर करावीत).

९. निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी पुरवठादारास केवळ एकच निविदा सादर करता येईल. एकापेक्षा अधिक निविदा सादर केल्याचे आढळून आल्यास अश्या पुरवठादाराचा निविदा प्रक्रियेमधील सहभाग रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

वरील निविदा प्रक्रियेमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत तसेच या सर्व अटी व शर्तींच्या आधीन राहून मी करार कालावधीमध्ये अनलिमिटेड (अमर्यादित) इंटरनेट सुविधा पुरवील.

पुरवठादाराची सही
शिक्का

पुरवठादाराचे नाव:
दिनांक: